# दिव्यांग उन्नती अभियान- कोल्हापूर

श्री. राजेंद्र गजेंद्र लवटे संशोधक विद्यार्थि **शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

---

**प्रस्तावना**:-

कोल्हापूरच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी समाजातील वंचित घटकांसाठी खूप काम केले. अशावंचित-दुर्लक्षित घटकांपैकी एक असलेल्या दिव्यांग व्यक्तींना त्यांचे हक्क प्राप्त करून देणे आणि त्यांच्यासाठी जाहीर केलेल्या योजनांचा त्यांना पूर्ण लाभ मिळवून देणे. यासाठी शासनही नेहमी आग्रही असते. सदर अभियानामध्ये शालेय विद्यार्थ्यांनांही अंतर्भूत केले होते. भारतामध्ये विविध ठिकाणी दिव्यांगाच्या पुनर्वसनासाठी अनेक शासकीय, निमशासकीय व स्वयंसेवी संस्था कार्यरत असलेल्या दिसतात. अशा संस्थांचे जाळे विकसित भागात केंद्रीत न होता संपूर्ण देशात पसरले पाहिजे, तरच दिव्यांग व्यक्तींचा ग्रामीण भागातही शोध घेऊनही त्यांचे पुनर्वसन करता येईल. त्याचबरोबर बोगस दिव्यांग प्रमाणपत्रक धारकांनाही पायबंद बसेल. जागतिक स्तरावर UNO राष्ट्रीय स्तरावर सायूर भारत सरकार, त्यानंतर राज्यसरकारे जरी दिव्यांगाच्या कल्याणार्थ उपाययोजना करत असले तरी समाजातील प्रत्येक घटकाने दिव्यांग सबलीकरण दृष्टीने पाऊले उचलणे आवश्यक आहे. केवळ शासकीय व प्रशासकीय पातळीवरील प्रयत्नच विकलांगतेच्या समस्या सोडविण्यासाठी पुरेशा नाहीत तर आवश्यकता आहे ती सामाजिक बदलाची, जो समाज अशा व्यक्तींना सकारात्मक, भेदभाव न करता, प्रेम व सदभावनामय जीवन विकलांगाना प्रदान करण्यास तत्पर असेल तरच अपंगाच्या समस्या कमी होतील.

अशाप्रकारे दिव्यांग व्यक्तीसाठी विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देवून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पूर्वपरवानगीने व कोल्हापूर जिल्हा परिषद मार्फत नाविन्यपूर्ण उपक्रमातंर्गत **"दिव्यांग उन्नती अभियान" २०१८** राबविण्याचे निश्चित झाले आहे.

**संशोधनाची गरज व महत्व**:-

शासनाच्या विविध धोरण व योजना दिव्यांगापर्यंत पोहचविणेसाठी या विषयाचा अभ्यास होणे महत्वाचा आहे, शासनाचे दिव्यांगासाठी असलेले धोरण व योजना अधिक व्यापकतेने राबविणेसाठी या अभ्यासाची आवश्यकता आहे. सदृढ व निकोप नागरिकांच्या बरोबर दिव्यांगाचा देखील विकास होवून सामाजिक न्याय प्रस्तापित होणेच्या दृष्टीने या अभ्यासाची आवश्यकता वाटते.

कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व ग्रामिण भागातील सर्व दिव्यांगाची नोंद घेवून त्यांना अपंग प्रमाणपत्र देणे, शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे व आरोग्यविषय संदर्भ सेवा पुरवून दिव्यांगाचे जीवनमान उंचावणेच्या गरजेतून जिल्ह्यात **"दिव्यांग उन्नती अभियान"** राबविणेत आले. त्यामुळे **"दिव्यांग उन्नती अभियान"** या योजनेचे संशोधन करणे गरजेचे आहे.

**उद्दिष्ट्ये :-**

1. कोल्हापूर जिल्ह्यातील राबविलेल्या दिव्यांग योजनेची माहिती करून घेणे.
2. दिव्यांग योजनेमुळे दिव्यांगाच्या जीवनात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.
3. दिव्यांगाच्या आरोग्य तपासणीची माहिती करून घेणे.

**परिकल्पना:-**

1. कोल्हापूर जिल्ह्यातील दिव्यांगांची नोंद करून त्यांची वैद्यकिय तपासणी केली आहे.
2. कोल्हापूर जिल्ह्यातील दिव्यांगांना शासकीय योजनेचा लाभ झालेमुळे त्यांचे जीवनमान उंचावले आहे.
3. दिव्यांगातत्वावर मात करण्यासाठी कृत्रिम अवयवाचा उपयोग झाला.

**नमुना निवड :-**

**"दिव्यांग उन्नती अभियान,२०१८"** या अभियानासाठी रॅन्डम सॅम्पलिंग सर्व्हेनुसार १००:१० प्रमाण घेवून खालील मुद्द्यांच्या आधारे नमुना निवड केली आहे.

I) निरीक्षण अनुसूची

II) मुलाखत अनुसूची

**माहिती संकलनाची साधने :-**

**१) प्राथमिक साधने -**

1. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अपंग-२०१६/प्र.क्र.२४/वित्त-३,मुंबई दिनांक-२१/०९/२०१६.
2. अपंग व्यक्ती कायदा, १९९५
3. महाराष्ट्र अपंग कल्याण कृती आराखडा २००१.
4. प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या मुलाखती.

**२) दुय्यम साधने -**

1. www,zpkolhapur.nic.in
2. www.sisa.maharashtra .gov.in

**संशोधन कार्यपध्दती:-**

अभियान अंमलबजावणीसाठी कालबध्द नियोजन केलेली कार्यवाही-

सदर अभियानाची अंमलबजावणी एकूण ४ टप्प्यामध्ये केली जाणार होती.

टप्पा क्रमांक १ - जिल्ह्यातील सर्व दिव्यांग व्यकतींची नोंदणी १००% करून ती संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध करणे.

टप्पा क्रमांक २ - दिव्यांगात्व प्रमाणपत्र नसलेल्या लाभार्थ्यांची तपासणी करून त्यांना दिव्यांगत्व प्रमाणपत्र देणे.

टप्पा क्रमांक ३ - दिव्यांग उपकरणे उपलब्ध करून देणेसाठी तपासणी कॅम्प घेणे.

टप्पा क्रमांक ४ - आरोग्य तपासणी करून संदर्भसेवा उपचार करणे, स्वावलंबन कार्ड देणे आणि शासकीय योजनाचे मेळावे घेणे. ३% खर्चातून योजना राबविणे.

**अभियान अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय समिती -**

या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती गठन करणेत आले असून सदरची समिती पुढीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| 1. | अध्यक्ष जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| 2. | उपाध्यक्ष जिल्हा परिषद समिती सभापती | सदस्य |
| 3. | मुख्य कार्यकारी अधिकारी | सदस्य |
| 4. | अधिष्ठाता शासकीय वैद्यकिय महाविद्यालय | सदस्य |
| 5. | जिल्हा शल्य चिकित्सक | सदस्य |
| 6. | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| 7. | सहा.आयुक्त समाज कल्याण | सदस्य |
| 8. | तहसीलदार (संजय गांधी योजना) | सदस्य |
| 9. | व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र | सदस्य |
| 10. | व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक | सदस्य |
| 11. | आगार प्रमुख एस.टी.(S.T.) महामंडळ | सदस्य |
| 12. | जिल्हा समन्वयक (म.फुले जीवनदायी आरोग्य योजना) | सदस्य |
| 13. | दिव्यांग संघटना प्रतिनिधी -२ | सदस्य |
| 14. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) | सदस्य |
| 15. | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | सदस्य |
| 16. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) | सदस्य |

**थोडक्यात कार्यवाही (आवश्यकतेनुसार) सांख्यिकीय माहितीच्या आलेखाचा समावेश करावा.**

**I) टप्पा क्रमांक १ ची अंमलबजावणी -**

जिल्ह्यातील सर्व दिव्यांग व्यक्तींची नोंदणी **"दिव्यांग उन्नती अभियान"** या अभियाना अंतर्गत पुढीलप्रमाणे करणेत आली.

जिल्हा परिषद, कोल्हापूर

| अपंगत्वाचा प्रकार | शाहूवाडी | पन्हाळा | हातकणंगले | शिरोळ | करवीर | गगनबावडा | राधानगरी | चंदगड | कागल | भुदरगड | आजरा | गडहिंग्लज | एकू |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) पूर्णतः अंध (Blindness) | 78 | 114 | 206 | 161 | 211 | 20 | 143 | 70 | 162 | 68 | 60 | 90 | 138 |
| २) अंशतः अंध (Low Vision) | 254 | 373 | 768 | 513 | 641 | 61 | 587 | 250 | 604 | 365 | 203 | 237 | 485 |
| ३) कर्णबधीर (Hearing Impairment) | 233 | 325 | 736 | 737 | 661 | 168 | 497 | 298 | 629 | 317 | 194 | 229 | 502 |
| ४) वाचा दोष (Speech and Language Disability) | 141 | 214 | 415 | 359 | 377 | 39 | 240 | 207 | 249 | 141 | 106 | 165 | 265 |
| ५) अस्थिव्यंग (Locomotor Disability) | 1251 | 1718 | 2951 | 2092 | 3013 | 233 | 2204 | 1556 | 2033 | 1529 | 905 | 1502 | 209 |
| ६) मानसिक आजार (Mental Illness) | 125 | 166 | 353 | 262 | 330 | 11 | 153 | 133 | 204 | 117 | 124 | 157 | 213 |
| ७) अध्ययन अक्षम (Learning Disability) | 15 | 10 | 25 | 30 | 33 | 9 | 32 | 15 | 24 | 17 | 12 | 8 | 23 |
| ८) मेंदूचा पक्षाघात (Cerebral Palsy) | 97 | 148 | 256 | 323 | 297 | 30 | 192 | 143 | 148 | 95 | 67 | 119 | 191 |
| ९) स्वमग्न (Autism) | 11 | 10 | 34 | 17 | 44 | 3 | 30 | 11 | 25 | 8 | 6 | 7 | 20 |
| १०) बहुविकलांग (Multiple Disability) | 103 | 132 | 349 | 273 | 240 | 26 | 157 | 156 | 149 | 46 | 88 | 103 | 182 |
| ११) कुष्ठरोग (Leprosy Cured Persons) | 10 | 16 | 44 | 34 | 47 | 3 | 13 | 20 | 62 | 18 | 6 | 21 | 29 |
| १२) बुटकेपणा (Dwarfism) | 34 | 55 | 95 | 90 | 79 | 17 | 44 | 47 | 90 | 31 | 33 | 31 | 64 |
| १३) बौद्धिक अक्षमता (Intellectual Disability) | 128 | 140 | 337 | 304 | 318 | 20 | 167 | 133 | 183 | 111 | 61 | 121 | 202 |
| १४) माशपेशीय क्षरण (Muscular Disability) | 5 | 5 | 82 | 34 | 25 | 1 | 9 | 25 | 25 | 6 | 8 | 4 | 22 |
| १५) मज्जासस्थेचे तीव्र आजार (chorionic Neurological Conditions) | 14 | 27 | 26 | 39 | 51 | 4 | 27 | 31 | 59 | 20 | 16 | 11 | 32 |
| १६) मल्टिपल स्क्लेरोसिस(Multiple sclerosis) | 3 | 7 | 20 | 26 | 12 | 8 | 14 | 17 | 38 | 15 | 8 | 7 | 17 |
| १७) थॅलेसिमिया (Thalassemia) | 1 | 7 | 34 | 10 | 9 | 0 | 16 | 8 | 20 | 3 | 3 | 3 | 114 |
| १८) अधिक रक्तस्त्राव (Hemophilia) | 2 | 2 | 11 | 12 | 3 | 1 | 3 | 3 | 3 | 4 | 0 | 5 | 49 |
| १९) सिकल सेल (Sickle Cell Disease) | 1 | 2 | 17 | 7 | 3 | 0 | 6 | 3 | 10 | 5 | 1 | 1 | 56 |
| २०) अॅसिड अटॅक (Acid Attack Victim) | 2 | 6 | 27 | 48 | 10 | 1 | 13 | 9 | 12 | 14 | 4 | 3 | 14 |
| २१) कंपवात रोग (Parkinson's Disease) | 5 | 10 | 45 | 23 | 41 | 4 | 31 | 21 | 25 | 21 | 13 | 11 | 25 |
| एकुण | 2513 | 3487 | 6831 | 5394 | 6445 | 659 | 4578 | 3156 | 4754 | 2951 | 1918 | 2835 | 455 |

कॉपीराईट © 2018 जिल्हा परिषद कोल्हापूर सर्व हक्क

II) संपूर्णकोल्हापूर जिल्ह्यामधील फक्त ग्रामिण भागासाठी असलेल्या या अभियानाचे ग्रामपंचायत स्तर, तालुकास्तर, जिल्हास्तरावर विविध अधिकारी व कर्मचा-यांच्या मदतीने कार्यशाळांचे आयोजन करणेत आले होते. प्रत्येक स्तरावर करावयाच्या कार्यवाहीचे आणि कालमर्यादेचे नियोजन करून प्रत्येक स्तरावरील अधिकारी व कर्मचा-यांची जबाबदारी निश्तिच करणेत आली.

कार्यशाळेमध्ये सुरूवातीस उपस्थितांना सदर मोहिमेचा उद्देश आणि त्याबाबत करावयाची कार्यवाही याबाबत अवगत केले. त्यासाठी तयार केलेल्या परिपत्रकाचे वाचन केले. त्यानंतर दिव्यांग नोंदणीचा फॉर्म कसा भरावा याबाबत 'आशा' आरोग्यसेविका व अंगणवाडी सेविकांना मार्गदर्शन करून त्यांच्या माध्यमातून गृहभेटी देवून नोंदणी करणेबाबत माहिती दिली. ऑनलाईन नोंदणी कशी करण्यात येणार आहे याबाबत ग्रामपंचायतीकडील ASSK केंद्रसंचालक यांना दोन फॉर्म ऑनलाईन भरणेचा डेमो दाखविला. प्रत्येक ग्रामपंचायतीला नोंदणीचा डाटा अद्यावत ठेवणेच्या सुचना देणेत आल्या. नोंदणी कार्यक्रमाबाबत ग्रामस्थांना विविध माध्यमातून जागृत करून संबंधित दिव्यांग व्यक्तीची पुरेशी कागदपत्रे नोंदणी करणा-या व्यक्तीकडे देण्याविषयी सुचित केले.

एकदिवसीय नोंदणी मोहिमेमध्ये १०० टक्के नोंदणी करणे आवश्यक केले गेले. नोंदणी ठरणे आवश्यक केले गेले. नोंदणी करणा-या कर्मचा-यास प्रत्येक दिव्यांगामागे २५ रूपये मानधन अदा केले. अशा प्रकारे नोंदणी करणेत आलेले सर्व फॉर्म जिल्हापरिषदेच्या

वेबसाईटवर उपलब्ध करणेबाबतचा पाठपुरावा प्रभाग सचिव यांनी केला. दिव्यांग सर्व्हेक्षणासाठी आवश्यक सॉफ्टवेअर वेबसाईट मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) यांनी केले तर ग्रामपंचायत स्तरावरील सर्व्हेक्षणाचे नियंत्रण व पर्यवेक्षण उपमुख्यकार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी केली.

III) टप्पा क्रमांक ३ अंमलबजावणी

जुलै २०१८ ते जानेवारी २०१९ या कालखंडामध्ये समाजकल्याण अधिकारी गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, विस्तार अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकानिहाय दिव्यांगत्व प्रमाणपत्र नसलेल्या लाभार्थ्यांना संख्येनुसार तपासणीच्या तारखा निश्चित केल्या. गेल्या संबंधित लाभार्थ्यांना तपासणीसाठी तालुकास्तरावर कॅम्प लावले. तसेच सी.पी.आर. कोल्हापूर येथे तपासणी करण्यासाठीचे नियोजन केले. त्यानंतर मिळालेल्या प्रमाणपत्राचे मान्यवरांच्या हस्ते वितरण केले गेले. संदर्भसेवा आवश्यक असलेल्या दिव्यांगांना पुढील उपचारासाठी संदर्भित/रेपर केले गेले. तसेच तपासणी पश्चात दिव्यांग व्यक्तींना साहित्य उपलब्ध करून देणेसाठी एलिम्को कंपनी (ALIMCO COMPANY),दिल्ली सारख्या कंपनीचे कॅम्प लावले गेले आणि २७२०० दिव्यांगत्व प्रमाणपत्र नसलेल्या दिव्यागांना प्रमाणपत्रे उपलब्ध करून दिली.

IV) टप्पा क्रमांक ४ अंमलबजावणी

११ मे ते २८ मे २०१९ या कालखंडामध्ये दिव्यांगांना उपकरणे उपलब्ध करून देणेसाठी तपासणी कॅम्प आयोजित केले होते. यासाठी विविध अधिका-यांच्या नियोजन व नियंत्रणाखाली तालुका स्तरावरील तपासणी शिबिराचे आयोजन केले. ग्रामिण रूग्णालय/उपजिल्हा रूग्णालय/प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रूग्णांची तपासणी करणेत आली. संदर्भ सेवा आवश्यक असलेल्या दिव्यांगांना पुढील उपचाराबाबत मार्गदर्शन केले. तसेच तपासणी पश्चात दिव्यांग व्यक्तींना लागणारे साहित्य एलिम्को कंपनी (ALIMCO COMPANY),दिल्ली जी **'भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम'** असून हा भारत सरकारचा एक उपक्रम आहे. सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालय,भारत सरकार यांच्या अंतर्गत ही कंपनी येत असून IS/ISO9001:2008 हे मानाकंन असलेली ही कंपनी एकूण दिव्यांग पूरक ३५५ प्रकारची साधने उत्पादित करते.

V) टप्पा क्रमांक ५ अंमलबजावणी

दिव्यांग व्यक्तींना वैयक्तिक तपासणीअंती पुढील उपचारासाठी त्यांना शस्त्रक्रियेसारख्या संदर्भीय सेवा पुरविल्या आणि शासनाच्या विविध योजनाअंतर्गत संबंधित लाभार्थ्यांना मोफत उपचाराच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या.

जिल्हापरिषद, पंचायतसमिती व ग्रामपंचायत स्तरावरील पाच टक्के निधीसाठी दि. २ ऑक्टोबरच्या ग्रामसभेत लाभार्थी निश्चित करून त्यांची अंमलबजावणी करणेसाठी सर्व स्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांना सुचना देणेत आल्या. दिव्यांगांना आवश्यकतेनुसार विविध शासकिय योजनांचे लाभ मिळवून देणेसाठी उदा. एस.टी., रेल्वे पास, आधारकार्ड, बँक खाते, विमा योजना, घरकुल, सामाजिक साहाय्य योजना, स्वावलंबन कार्ड, इत्यादी योजनासाठी मेळाव्यांचे आयोजन केले.

एलिम्को कंपनी (ALIMCO COMPANY),दिल्ली च्या माध्यमातून दिव्यांगासाठी मागणी केलेले साहित्य वाटपासाठी संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामिण भागातून पात्र ठरलेले १५५९६ दिव्यांगांना दि. २५/०२/२०२० रोजी मेळाव्यातून मान्यवरांच्या हस्ते वाटप करणेत आले. जिजामाता हॉल, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे आवर्जून उपस्थित असलेले नामदार, राजकीय पदाधिकारी, शासकीय अधिकारी व शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू, व प्र.कुलगुरू, कुलसचिव यांची उपस्थिती प्रामुख्याने होती. वरील मान्यवरांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींना पुरक साहित्य वाटप करणेत आले.

**शिफारशी :-**

1. राज्यभर अशा अभियानाची गरज आहे. (दिव्यांग उन्नती अभियान)
2. अपंग प्रमाणपत्रांची पडताळणी होणे आवश्यक आहे.
3. भारत सरकारच्या एक उपक्रम असलेल्या एलिम्को कंपनी (ALIMCO COMPANY) च्या माध्यमातून कृत्रिम अवयव दिव्यांगांना मोफत मिळावे.
4. पाच टक्के खर्चाची योजना प्रत्येकस्थानिक स्वराज्य संस्थामध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी केली जावी.
5. दिव्यांगाच्या आर्थिक विकासाची नाडी असलेल्या 'महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळाचे' सक्षमीकरण व्हावे.
6. दिव्यांगासाठीच्या योजनांच्या अंमलबजावणीचे मूल्यांकन करणारी स्वतंत्र/नि:पक्षपाती/तज्ञ/प्रामाणिक यंत्रणा तयार व्हावी.
7. उच्च शिक्षणातील दिव्यांगांचा संख्या वाढीसाठी विशेष प्रयत्न व्हावेत.
8. दिव्यांग मुलांच्या पालकांच्या मानसिकतेवर झालेल्या विपरीत परिणाम दूर करणेसाठी विशेष प्रयत्न व्हावे.

**निष्कर्ष :-**

1. दिव्यांगाची वैद्यकिय तपासणी झाली आहे.
2. कृत्रिम अवयवामुळे दिव्यांगाना दिव्यांगत्वावर मात करणेस मदत झाली आहे.
3. कोल्हापूर जिल्ह्यातील दिव्यांगाना शासकीय योजनांचा फायदा झाल्याने त्यांचे जीवनमान सुधारला आहे.

**संदर्भ :-**

1. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अपंग-२०१६/प्र.क्र.२४/वित्त-३,मुंबई दिनांक-२१/०९/२०१६.

2. अपंग व्यक्ती कायदा, १९९५
3. महाराष्ट्र अपंग कल्याण कृती आराखडा २००१.
4. प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या मुलाखती.
5. www,zpkolhapur.nic.in
6. www.sisa.maharashtra .gov.in
7. www.enwikipidia.com.com

**पुस्तके :-**

1. समावेशीत शिक्षण (२००५) संपादक व प्रकाशक - एम.जी. मराठे, शालेय शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य,.
2. विशेष शिक्षण - डॉ.जोशी/ प्रा.कदम/प्रा.जाधव, विद्या प्रकाशन, नागपूर.
3. निष्ठा प्रशिक्षण.
4. योजना मासिक (माहे एप्रिल,२०१३) प्रकाशक - माहिती वप्रसारण मंत्रालय, भारत सरकार, संपादक- राजेशकुमार झा.